लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ३४ वा | गुरुवार, दि. २२ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग
▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# सोलापूरकरांना दिलेला शब्द पाळणार का ?

## नोव्हेंबरपासून 2 दिवसाआड पाणी मिळणार का ?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ते उजनी या समांतर जलवाहिनीचा १०० किलोमीटरचा टप्पा तीन-चार दिवसांत पूर्ण होत आहे. तब्बल १३ वर्षांपासून सोलापूरकरांना तीन-चार दिवसाआड पाणी मिळत आहे.

आता समांतर जलवाहिनी पूर्ण झाल्यानंतर सोलापूरकरांना दोन-तीन दिवसाआड पाणी मिळणार आहे.

विधानसभा निवडणुकीत विरोधकांना त्यावर प्रचाराची संधी मिळू नये म्हणून जलवाहिनीचे काम ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रशासनावर राजकीय दबाव असल्याची चर्चा आहे.

श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याची चिमणी पाडल्यानंतर दोन महिन्यात विमानसेवा सुरू होईल, असे सांगण्यात आले. पण, सव्वा वर्ष होऊनही विमानसेवा सुरू झाली नाही. त्याचा फटका लोकसभा निवडणुकीत बसल्याचे पाहायला मिळाले. आता विमानसेवा सुरू करण्याच्या दृष्टीने वेगवान हालचाली सुरू आहेत.

दुसरीकडे सोलापूरकरांच्या पाण्याचाही प्रश्न कायमचा निकाली निघावा, यासाठी समांतर जलवाहिनी ऑक्टोबरअखेर पूर्ण व्हावी, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. केंद्रात, राज्यात व महापालिकेत सत्ता असूनही भाजपला सोलापूर शहराचा पाणीप्रश्न सोडविता आला नाही, अशी टीका विरोधकांकडून होत आहे.

या पार्श्वभूमीवर विधानसभा आचारसंहितेपूर्वी सोलापूरकरांना दोन दिवसाआड पाणी मिळावे, यासाठी सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी वरवडे, टेंभुर्णी, उजनी धरणाजवळील आढेगाव व हिवरे या गावाजवळील अडथळे दूर करण्यासाठी राज्य स्तरावरून प्रयत्न सुरू आहेत.

### ५० वर्षे टिकतील पाइप

सध्या सोलापूर ते उजनी (११० किमी) समांतर जलवाहिनी टाकली जात आहे. या कामासाठी कोटिंग असलेले पाइप वापरले जात आहेत. ते पाइप किमान ५० वर्षे टिकतील, असे आहेत. दुसरीकडे जलवाहिनी मुरमाड भागात टाकली जात असल्याने निश्चितपणे ५० वर्षे तरी काही होणार नाही, असा विश्वास महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### आठवड्यात दोन व तीन दिवसाआड पाणी



समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर तीन महिने प्रात्यक्षिक होईल. त्यानंतर पाण्याच्या वेळा कमी करून आठवड्यातून दोन व तीन दिवसाआड पाणी दिले जाणार आहे. मात्र, दररोज पाणी मिळण्यासाठी अमृत-२मधील कामे आणि पाकणीतील नवीन पंपहाऊस होण्याची वाट पहावी लागेल. समांतर जलवाहिनी झाल्यावर जुने पंप बंद करून नवीन पंप टाकून त्याठिकाणी ८० एमएलडी पाणी साठवले जाईल. सोरेगाव पंप हाऊसवर ११० ते १२० एमएलडी साठवले जाईल. अमृत-२मधील व पाकणीचे पंपहाऊस होईपर्यंत टाकळी व उजनीवरील पाइपलाइनचे पाणी तेथे साठविण्याचे नियोजन आहे. नियमित पाणीपुरवठ्यासाठी सोलापूरकरांना आणखी एक ते दीड वर्षे वाट पहावी लागेल, असेही महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सांगितले.










## संपादकीय

# मागच्या दाराने भरती

केंद्र सरकार आता आणखी एका नव्या वादाच्या भोर्वयात सापडले आहे. यावेळचा हा वाद केंद्र सरकारच्या प्रशासकीय सेवेत मागच्या दाराने केल्या जार्णाया भरतीचा आहे. अलीकडेच सरकारने प्रशासकीय सेवेतील 45 अधिर्कायांच्या भरतीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. अतिरिक्त सचिव किंवा संचालक पदाच्या दर्जाच्या अधिर्कायांच्या भरतीसाठी ही जाहिरात आहे. ही करार पद्धतीने केली जाणारी भरती असणार आहे. एरवी या पदावरील नियुक्त्या यूपीएससीतर्फे केल्या जातात. पण यूपीएससीला टाळून सरकार परस्पर या महत्त्वाच्या पदावरील नियुक्त्या करीत असल्याने देशातले सर्वच विरोधी पक्षांचे नेते एकदम संतापले आहेत. त्यांचा मुख्य आक्षेप असा आहे की, उच्चपदांवरील आरक्षण टाळण्यासाठी सरकारने हा कट रचला आहे.

त्यातून मागास, अन्य मागास आणि अल्पसंख्याकांच्या हक्काचे आरक्षण डावलले जाते आणि केवळ त्यासाठीच सरकारचा हा खटाटोप सुरू आहे, असे विरोधी पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, प्रशासकीय सेवेतील भरतीसाठी यूपीएससीची प्रक्रिया टाळून थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांना प्रशासनात घुसवण्यासाठीचा हा खटाटोप आहे. अखिलेश यादव, बहुजन समाज पक्षाच्या नेत्या मायावती अशा नेत्यांनीही या विरोधात टीकेची झोड उठवली असून अखिलेश यादव यांनी या निर्णयाच्या विरोधात 2 ऑक्टोबरपासून आंदोलनाचीही हाक दिली आहे. मायावतींचे म्हणणे असे आहे की, दलित आणि मागासांना पदोन्नतीने जी पदे मिळणे अपेक्षित असते ती पदे आता मागच्या दाराने कराराने भरली जाणार आहेत म्हणजे मागासांचे हक्क डावलण्याचाच हा प्रकार आहे.

या प्रकरणाला सरकारचीही काही बाजू आहे, त्यात त्यांनी म्हटले आहे की अशा पद्धतीच्या लॅटर एन्ट्रीने भरतीची प्रक्रिया करण्याची गरज, यूपीए सरकारच्या काळात नेमण्यात आलेल्या वीरप्पा मोईली यांच्या प्रशासकीय कामकाज सुधारणा समितीने व्यक्त केली होती व तशी शिफारस त्यांनी त्यावेळी केंद्र सरकारला केली होती. त्यानुसारच ही भरती केली जात आहे असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. म्हणजेच यूपीए काळातच ही पद्धत सुरू करण्यात आली आहे असे सरकारचे सांगणे आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, ही शिफारस वीरप्पा मोईली समितीने केली असेलही; पण त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे मात्र यूपीए सरकारने टाळले होते. या निर्णयाची अंमलबजावणी करून मागच्या दाराने भरती करण्याचे काम प्रत्यक्ष मोदी सरकारच्याच काळात सुरू झाले आहे हे नाकारता येत नाही. मुळात वीरप्पा मोईली समितीच्या शिफारशीचा मुद्दा प्रामुख्याने तज्ज्ञांच्या प्रशासकीय सेवेतील भरतीसाठी मर्यादित होता.

या समितीच्या अहवालाचा सारांश असा की यूपीएसएसी परीक्षेद्वारे जे लोक आयएएस, आयपीएस किंवा अन्य प्रशासकीय सेवांमध्ये भरती होतात, त्यांच्यातून काही विशिष्ट कामांसाठी जी तज्ज्ञांची गरज लागते त्याची कमतरता जाणवते. सरकारकडून अनेक क्षेत्रात कामे सुरू असतात. त्यात विज्ञान तंत्रज्ञान किंवा दूरसंचार अशा तांत्रिक सेवांसाठीच्याही कामाचा समावेश असतो. त्या संबंधातील निर्णय घेताना त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत केंद्र सरकारला हवी असते. ती गरज अशा काही मोजक्या क्षेत्रातील जागांमध्ये थेट भरती करून भागवता येते. मोईली समितीला हेच अपेक्षित असावे. आता केंद्र सरकारने जी 45 अधिर्कायांची भरती करण्याचे योजले आहे त्यात केवळ हाच हेतू आहे काय हे नीट उमगलेले नाही. आधीच या सरकारच्या विरोधात ते आरक्षण विरोधी असल्याचा आरोप सातत्याने होतो आहे. अशा पद्धतीच्या मागील दाराने केल्या जाणाऱ्या भरतीने हा आरोप अधोरेखित होतो आहे.

काहींच्या म्हणण्यानुसार, सरकारने हा केवळ एक खडा टाकण्यासाठी केलेला प्रयत्न आहे. तो चालून गेला, तर पुढील काळात बाकीच्या प्रशासकीय पदांवरही आपल्याच विचारांचे लोक सर्रास स्वरूपात भरती करण्याचा सरकारचा डाव असावा, असाही आक्षेप घेतला जाऊ लागला आहे. प्रशासकीय पदांवर आपल्याच विचारांचे लोक गैरमागार्ने भरती केले तर त्याचा थेट परिणाम लोकांवरही कसा होऊ शकतो याचे उदाहरण देण्यासाठी राहुल गांधी यांनी 'सेबी'च्या अध्यक्षा माधबी बुच यांचे उदाहरण दिले आहे. माधबी बुच या अदानी समूहाच्याच भागीदार असल्याची बाब हिंडेनबर्गच्या अहवालातून समोर आली आहे आणि त्यांनी अदानी समूहाच्या गैरव्यवहारांच्या चौकशीत कसा कोलदांडा घालण्याचा प्रयत्न केला तेही प्रकाशात येऊ लागले आहे. केंद्र सरकारच्या प्रशासकीय अधिर्कायांच्या हातात अनेक अधिकार असतात. ज्यांचा लोकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम होऊ शकतो.

चौकशी टाळणे, अन्यायकारक प्रकरणे दडपून टाकणे, भ्रष्टाचारावर पांघरुण घालणे अशी कामे या अधिर्कायांना हाताशी धरून करून घेणे सरकारला अवघड नसते. त्यामुळे सरकारची ही मागच्या दाराने होणारी अधिकारी भरती अनेक अर्थाने नुकसानदायक आहे ही बाब बर्याच अंशी खरी आहे. सरकार यातून लगेच माघार घेईल असे संभवत नाही, पण निदान यातील वाद टाळण्याच्या तरी उपाययोजना सरकारला निश्चित करता येतील. त्यातही मागासांवर अन्याय होणार नाही हेही सरकारला पाहावे लागणार आहे. या वादाचा दुसरा एक पैलू असा की अशा मागच्या दाराने भरती होर्णाया अधिर्कायांमुळे जे आयएएस सेवेची परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रशासकीय सेवेत दाखल झाले आहेत तेही दुखावले जाणार आहेत.

या अधिकाऱ्यांच्या लॉबीला दुखावणे देशाच्या हिताचे नाही. या वादाला अनेक पैलू असल्याने आणि त्याचा थेट संबंध सरकारच्या हेतूशी असल्याने सरकारला सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. सरकारने या आधीच 'अग्निवीर योजने'द्वारे चार वर्षांच्या कंत्राटी पद्धतीची लष्कर भरती सुरू केली आहे. ती योजना संपूर्ण देशात वादग्रस्त ठरली आहे. पण सरकारने त्याचा पुनर्विचार अजून सुरू केलेला नाही. उलट सरकारने त्याचे जोरदार समर्थनच लावलेले दिसले आहे. आता अशी कंत्राटी स्वरूपाची प्रशासकीय भरती सुरू करून सरकार नेमके काय साधणार आहे, हे कळेनासे झाले आहे. याबाबत लोकांच्या मनातील शंकांचे निरसन समर्पकरितीने होणे गरजेचे आहे.

# मानवतेला काळीमा फासणारी घटना

कोलकात्यात एका डॉक्टर असलेल्या तरुण मुलीवर झालेल्या अत्याचाराने देशात संतापाची लाट उसळली असतानाच आपल्या महाराष्ट्रात त्याहून संतापजनक घटना घडली. बदलापूर शहरातील एका नामांकित शाळेत चार वर्षाच्या दोन मुलींवर शाळेतच अत्याचार झाला. मन सुन्न करणारी ही घटना समोर आल्यावर नागरिकांच्या संतापाचा कडेलोट झाला आणि यात दोषी असलेल्या नराधमाला फाशी द्यावी यासाठी नागरिक मैदानावर उतरून आंदोलन करू लागले. बदलापूरच्या घटनेने केवळ बदलापूर मध्येच नव्हे तर राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. बदलापूरची घटना ही मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेने राज्यात महिला तसेच मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अर्थात महाराष्ट्रात घडलेली ही पहिली घृणास्पद घटना नाही मागील काही वर्षात तर अशा घटनांची मालिकाच सुरू आहे मागील वर्षीच पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातील वानवडी परिसरात घडली होती. त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीची सुरक्षा राक्षकाने हत्या केल्याची बातमी आली होती. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर एका नाराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला होता. कोपर्डीची घटना तर अजूनही ताजीच आहे अर्थात वर उल्लेख केलेल्या घटना या फक्त प्रातिनिधिक आहेत अशा घटना आपल्या राज्यात दररोज घडत असतात. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला



अत्याचाराची एक तरी घटना वाचायला मिळतेच. घटना घडून गेल्यावर शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा करण्याचे आश्वासन दिले जाते अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडून शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. बदलापुरात बारा तासांनी पोलिसांनी गुन्हा नोंदवला पोलिसांनी इतक्या संवेदनशील प्रकरणात इतकी असंवेदनशीलता दाखवणे निषेधार्हच आहे अर्थात पोलिसांनी असे करावे यासाठी पोलिसांवर कोणाचा दबाव होता का? याचीही चौकशी व्हायला हवी. यात शाळा प्रशासनाची देखील मोठी चूक आहे. शाळा प्रशासनाने हे प्रकरण दाबण्याचाच प्रयत्न केल्याचे वरकरणी दिसत आहे. दिवसाढवळ्या महिलांची, मुलींची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहे. फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना कठोरात कठोर शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# छंदाने जीवन । होई परिपूर्ण

'तुम्हाला कोणता छंद आहे ?' असा प्रश्न जर प्रगत राष्ट्रातील नोकरी देणाऱ्यांनी विचारला, तर कोणतंही उत्तर चालतं. पण भारतातील खडूस मालकांनी हा प्रश्न विचारला, तर मात्र उमेदवाराने, 'तुम्ही म्हणता तसला कोणताही छंद मी बाळगलेला नाही. कारण मला छंद मुळीच आवडत नाहीत!' हेच उत्तर देणं सर्वोत्तम ठरतं. अन्यथा नोकरीची संधी नक्की हुकते. परदेशात परिपूर्ण व्यक्तिमत्त्व महत्त्वाचं मानलं जातं. पण भारतात नोकर हा पतिव्रतेसारखा नोकरीशी एकनिष्ठ असावा, तो छंदीफंदी असू नये, छांदिष्ट तर मुळीच असू नये, असं सारेच मानतात. एखाद्या वेळी नोकर एककल्ली असला तर चालेल, एकमार्गी असला तरी चालेल, एकांगी विचार करणारा असला तर फारच उत्तम! कारण अशी माणसे एकनिष्ठ असतात, असा आपला देशव्यापी विचारच आहे. म्हणून छंद न जोपासणाऱ्यांचा देश, हीच भारताची दुर्दैवाने खरी ओळख आहे.

त्यामुळेच आपल्या शिक्षणविचारात पाठांतराला महत्त्व आहे. लेखनाला तर नको तितकं महत्त्व दिलं गेलं आहे. गुणवत्ता यादीत येणं म्हणजे तर स्वर्गाची प्रवेशपत्रिका मिळणंच! पण फुरसतीच्या वेळेचं शिक्षण (Education For leisure time) ही संकल्पना आपल्या देशात रुजलीही नाही आणि वाढलीही नाही. शिक्षणशास्त्राच्या पुस्तकात ती गंजून गेली आणि शिक्षित देशवासीसुद्धा एकसुरी, रटाळ जीवन जगता जगता पार आंबून गेले. वास्तविक शिक्षण आणि छंद यांचं योग्य मिश्रण म्हणजे परिपूर्ण व्यक्तिमत्त्व! शिक्षणतज्ज्ञ डॉ. वाटवे जीवनातील छंदाच्या आवश्यकतेवर भर देताना म्हणतात, 'आपल्या जीवनात अखरेपर्यंत एखादा छंद असला पाहिजे. छंदामुळे वृत्तीची एकाग्रता साधते आणि जीवनातील लहानसहान उणिवा नि चिंतांमुळे येणारी मानसिक व्यग्रता मनाला विनाकारण बेचैन करू शकत नाही.' फुरसतीच्या वेळेचं शिक्षण देण्याची पद्धतशीर व्यवस्था प्राथमिक शिक्षणापासून पदव्युत्तर पातळीपर्यंत आपण केली असती, तर विद्यार्थ्यांच्या आत्महत्या किंवा त्यांच्या रॅगिंग(परपीडन) सारख्या उन्मादी कृत्यांना नक्कीच आळा बसला असता, यात वाद नाही. 'An empty mind is devils workshop' असं म्हटलं जातं. वयात येणाऱ्या मुलांबाबत ते अधिक खरं असतं. छंदाची जोपासना करणारा विद्यार्थी कधीही रिकामटेकडा असत नाही, मगत्याच्या मनात सैतानी चाळ्यांना वाव कसा मिळू शकेल? छंदाचं जीवनातील महत्त्व सांगताना एक विचारवंत म्हणतात, 'छंदामुळे माणसाचं सारं जीवनच बदलून जातं. छांदिष्ट माणूस आपलं जीवन कधीही एकसुरी, एकरंगी बनू देत नाही. त्याचं जीवन छंदामुळे बहुरंगी, बहुढंगी बनतं.' दुसरे एक विचारवंत त्याहून महत्त्वाचा सिद्धान्त सांगताना म्हणतात, 'प्रत्येकाला मनापासून जोपासलेला एखादा छंद असेल, तर जीवनात वैफल्य कधीच येणार नाही. उद्योग, व्यवसाय, नोकरीची सोबत आयुष्यभर मिळणं शक्य नसतं. पण छंद सदासर्वकाळ जीवनाची सोबत करतात म्हणून शहाणा माणूस छंदाची मैत्री करतो.' मनाचा कल पाहून छंद जोपासावा, हे खरं. पण तरीही जीवनवादी तज्ज्ञांचं, शिक्षकांचं छंद निवडतानाचं मार्गदर्शन घेणं आवश्यक असतं. पोष्टाची तिकिटं जमवणं, विविध देशांची नाणी आणि चलनी नोटा जमवणं, हा छंद त्यांची प्रदर्शनं भरवल्याशिवाय पूर्ण होत नाही. त्यापेक्षा नोकरी-धंदा सांभाळून, शिक्षण घेत घेत गायन, वादन, अभिनय, कथाकथन, चरित्रकथन, एकपात्री प्रयोग, नकला करणं, संमोहनशास्त्र शिकणं, विविध भाषा शिकणं (स्वयं अध्ययनाच्या पुस्तकांच्या मदतीने), पोवाडे रचणं आणि सादर करणं, कवितांचं सादरीकरण, वक्तृत्वाचा छंद जोपासणं, योगासनांचा अभ्यास करून लोकांना शिकवणं, स्वतःच्या आवडीचे खाद्यपदार्थ स्वतः तयार करणं, चित्रकला, थोर पुरुषांच्या आठवणी सादर करणं, कथा, कादंबरी, नाटकं, नाटिका, नाट्यछटा लिहिणं आणि त्यांचं सादरीकरण असे कितीतरी छंद प्रत्येक स्त्री किंवा पुरुष, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक सांभाळू शकतात. मात्र छंद जोपासनेतून द्रव्यार्जन तरी झालं पाहिजे किंवा प्रसिद्धी तरी लाभली पाहिजे, निदान आपला छंद समाजाचं मनोरंजन तरी करण्याइतका कसदार असला पाहिजे; एवढं पथ्य जरी छंदोपासकाने सांभाळलं, तरी खूपवझालं. मात्र छंद आजन्म जोपासले पाहिजेत. ईश्वरभक्तीचा छंद मात्र कुचकामी असतो. मना लागो छंद, गोपाळ गोविंद म्हणणाऱ्या संतापेक्षा कांदा मुळा भाजी हीच विठाई माझी, हा संत सावतामाळी यांचा उत्पादक छंद लाखमोलाचा! एका छांदिष्टाने ज्ञानेश्वरीची हस्तलिखित प्रत तयार करून आपला धार्मिकनादिष्टपणा प्रदर्शित केला आणि आयुष्यातीलसोन्याहून मूल्यवान वेळ मातीमोल केला.देवपूजेच्या छंदापेक्षा व्यायामाचा छंद फारचांगला. तीर्थयात्रेच्या आणि अष्टविनायक, बाराज्योतिर्लिंग, चारधाम यात्रेच्या छंदापेक्षा म्हैसूर-बेंगलोर, प्रतापगड - रायगड, कुलूमनाली, केरळ-कन्याकुमारीच्या पर्यटनाचा छंद माणसाला अधिक आनंद देणारा नक्की असेल. इहवादी छंदातच जीवनाचं सार्थक असतं, हेच खरे! म्हणून लक्षात घ्या-

छंदाने जीवन। होई परिपूर्ण
छंद समाधान । माणसाचे ॥१
जीवनाचे ओझे । हलके व्हावया
छंदाची किमया । आवश्यक ॥२
व्यष्टी - समष्टीचे । कल्याण करावे
छंदाला असावे । असे हेतू ॥ ३
सुवासिक फुलापरि । छंद हवा
सौख्यलाभ व्हावा । याला - त्याला ॥४
कलेचा विकास। घडवी जो छंद
त्याहून आनंद। नाही दुजा ॥ ५
विटीदांडू किंवा । गोट्या नव्हे छंद
जीवन बेबंद। करणारे ॥६
भाविकांचे छंद। छंद नव्हे त्रास
घेतलेला फास । निजहस्ते ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

# सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी उच्चाधिकार समितीकडून 282.75 कोटी मंजूर - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा हा पर्यटनासाठी खूप महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पर्यटन पूरक उद्योग वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती शक्य आहे. यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला वेग येईल तसेच येथून होणारे स्थलांतर ही थांबेल. त्यामुळे उजनी जल पर्यटन 190 कोटी 19 लाख, कृषी पर्यटन 19 कोटी 30 लाख, विनयार्ड पर्यटन 48 कोटी 26 लाख, धार्मिक पर्यटन 25 कोटी असा एकूण 282.75 कोटीचा जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज मुंबई येथे राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीकडे सादर केला. व समितीकडून या आराखड्यासाठी 282.75 कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीमध्ये प्रथम सादर करण्यात आला. जिल्ह्याच्या पर्यटनाच्या अनुषंगाने महत्त्वाच्या बाबी यात नमूद करून त्यासाठी लागणारी तरतूद करून हा आराखडा समितीने मंजूर केला. त्यानंतर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याला मान्यता प्रदान केली. तर माहे जून 2024 मध्ये पुणे येथे झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे हा पर्यटन आराखडा सादर केला होता. त्यावेळी उपमुख्यमंत्री महोदय यांनी या आराखड्याला तत्वतः मंजुरी दिलेली होती.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेला हा आराखडा उच्चाधिकार समितीकडे पाठवण्यात आला. आज मुंबई येथे राज्याच्या मा.मुख्य सचिव श्रीमती सुनिता सौनिक यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने या आराखड्यातील बाबींचे बारकाईने माहिती घेऊन यातील 282.75 कोटी रुपयांच्या विविध कामांना मंजुरी प्रदान केली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याचे उच्चाधिकार समितीसमोर पीपीटीद्वारे सादरीकरण केले. हे सादरीकरण करत असताना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती तसेच पर्यटनासाठी खूप महत्त्वपूर्ण जिल्हा असल्याची माहिती देऊन हा आराखडा मंजूर झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था वेगाने वाढण्यास मदत होईल. तसेच, येथून होणारे स्थलांतर रोखले जाईल यासाठी हा प्रकल्प खूप महत्त्वाचा असल्याचे समितीला जिल्हाधिकारी यांनी पटवून दिले.

**राज्यासाठी पथ दर्शक प्रकल्प**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उच्चाधिकार समिती समोर सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याचे ज्या पद्धतीने सादरीकरण केले. तसेच, या आराखड्यामध्ये सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पर्यटनाच्या दृष्टीने अंतर्भूत केलेल्या बाबी किती महत्त्वपूर्ण आहेत याची जाणीव समितीला झाली. आराखड्याची मांडणी व सादरीकरणाबद्दल उच्चाधिकार समितीच्या अध्यक्ष तथा मुख्य सचिव व अन्य सर्व सदस्यांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे विशेष कौतुक केले. तसेच, हा प्रकल्प राज्यासाठी पथदर्शक असेल असेही समितीने सांगितले.

या बैठकीसाठी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी उपस्थित होते.

**एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प**

जिल्ह्यात संपूर्ण जगातील पर्यटकांना जल, कृषी, विनयार्ड व धार्मिक पर्यटनाचा अनुभव देणे हा या एकात्मिक पर्यटन प्रकल्पाचा आत्मा व यु. एस. पी. देखील आहे. यासाठी प्रकल्पातून जिल्ह्यात एकात्मिक पर्यटन सर्किट विकसित केले जाणार आहे. या प्रकल्पाच्या निमित्ताने जिल्ह्यात वेगवेगळी पथदर्शी उदाहरणे (कृषी पर्यटन, कृषी मॉल, जल पर्यटन ई बाबतची मॉडेल्स) उभी राहतील की, जी पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील उद्योजकांना पर्यटन क्षेत्रातील विविध संधी दर्शवतील व यासारखे उपक्रम एक व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रेरणा देतील. यामुळे जिल्ह्यात पुढील 8-10 वर्षात पर्यटन उद्योगात मोठी आर्थिक गुंतवणूक होऊन विकासाची प्रकिया वेग धरेल व एकंदरीत स्थानिक व जिल्ह्यावासियांचे जीवनमान उंचावेल.

एकात्मिक पर्यटन सर्किटमध्ये उजनी धरणातील जल पर्यटन हे पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण असेल. पर्यटकांना यासोबतच येथे धरणाच्या जलाशयाचा भाग, सभोवतालील निसर्गरम्य परिसर, जल क्रीडा उपक्रम, विविध देशी तसेच विदेशी पक्षी, ईत्यादीचे नैसर्गिक सौंदर्य न्याहाळता येईल. पुढे सर्किट मध्ये परिसरातील कृषी पर्यटन केंद्रे, धार्मिक स्थळे, विनयार्ड पर्यटन, तलाव, किल्ले, वारसा स्थळे यांना भेटी देता येतील. पर्यटकांना साधारणतः आठवडाभर पर्यटन सर्किटमध्ये असलेल्या विविध स्थळांना (जल, धार्मिक, कृषी, नैसर्गिक विनयार्ड पर्यटन स्थळांना) भेटी देऊन पर्यटनाचा आस्वाद घेता येणार आहे. निश्चितच यामुळे स्थानिक पातळीवर पर्यटन पूरक उद्योग वाढतील, मोठ्या प्रमाणात रोजगाराची निर्मिती होईल व यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होऊन जिल्ह्याची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढण्यासाठी गती मिळणार आहे.

या प्रकल्पामुळे सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारच्या उद्योग उभे राहण्यास चालना मिळेल व त्यामुळे टूर गाइड, हॉटेल आणि रिसॉर्ट कर्मचारी, अन्न आणि पेय सेवा कर्मचारी, ट्रॅव्हल एजंट, वाहतूक सेवा (बस, कार, टॅक्सी) सुविधा देणारे, विविध कार्यक्रमांचे नियोजन करणारे, मनोरंजनाचे कार्यक्रम करणारे कलाकार / लोक कलाकार, दुकानदार व किरकोळ वस्तू विक्रेते, संग्रहालय आणि वारसा साइट कर्मचारी, संवर्धन कामगार, ग्राहक सेवा प्रतिनिधी, बांधकाम व देखभाल दुरुस्ती कामगार, स्पा आणि वेलनेस कर्मचारी, स्वच्छता सेवा सुविधा देणारे कामगार यांचेसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.




# निराधारांच्या चुली पेटवून त्यांचा आधार बनण्याचे कार्य बहुजन शिक्षक महासंघ करते- भालशंकर

**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** अन्यायग्रस्त तसेच निराधार शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या बंद पडलेल्या चुली पेटवून त्यांचा आधार बनण्याचे महनीय कार्य महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघ आजही करीत असून शरीरात शेवटचा श्वास आहे तोपर्यंत करीत राहू, असा विश्वास महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांनी दिला. ते महासंघाच्या वतीने आयोजित केलेल्या सोलापूर येथील



महानगरपालिकेच्या हिरवळीवरील स्नेह मेळाव्यात अध्यक्षपदावरून बोलत होते.

यावेळी राज्य सरचिटणीस प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, उपाध्यक्ष उपप्राचार्य प्रकाश शिंदे आणि रमेश लोखंडे, मराठवाडा विभाग प्रमुख मुख्याध्यापक किशोर बनसोडे, जिल्हाध्यक्ष युवराज भोसले आदी उपस्थित होते.

गेली अनेक महिने, वर्ष ज्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ आय डी यासह इतर प्रस्ताव संस्थाचालक, अधिकारी यांच्या अकार्यक्षम कारभारामुळे अनेक शिक्षक व कर्मचारी निराधार होऊन त्यांच्या चुली बंद पडल्या होत्या. असे प्रस्ताव माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या पुढाकाराने मान्य करून घेण्यात आले. यामध्ये प्रिया कदम (श्रीनाथ प्रशाला, सोलापूर), इरफान शेख (भंडाररकवठे प्रशाला, ता.द. सोलापूर), दिपाली कोळेकर (सोलापूर), शाहूराज ठोंबरे (बार्शी) आदी निराधार शिक्षक व कर्मचारी यांना आधार देऊन त्यांच्या चुली पेटल्याने आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, रमेश लोखंडे, उपप्राचार्य प्रकाश शिंदे, विठ्ठल एकमल्ली आदीने आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी बार्शी शहराध्यक्ष मल्लिकार्जुन कांबळे, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष नितीन गायकवाड, मोहोळ तालुकाध्यक्ष शिवाजी जगताप, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष दत्तात्रय शिंदे, मंगळवेढा तालुकाध्यक्ष विठ्ठल एकमल्ली, सोलापूर शहराध्यक्ष संजयकुमार शिवशरण, सिद्राम मुली (अक्कलकोट), माढा तालुकाध्यक्ष प्रफुल्ल जानराव, जिल्हा खजिनदार दाऊत आतार, रोहित शिंदे, सदानंद कोळी, राजेंद्र मलमे, इरफान शेख, आसिफ कंदलगावकर, प्रिया कदम, स्वप्नजा कसबे, निर्मला मौळे,डॉ. श्रुतिका उडानशिव, विठ्ठल मोरे, यशपाल आकाडे, महानंदा शिंदे, अमिना शेख, प्रा.अभिजित भंडारे, एकोराम चौगुले, नागेश सातपुते, संदीप राजगुरू, शिवानंद चौगुले, जलील शहानूरकर, नीलकंठ अय्यर, महेश क्षीरसागर, आगतराव बनसोडे, इन्नुस बाळगी, खंडू कोकरे, दिनेश बनसोडे असे असंख्य पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

मेळाव्याचे प्रास्ताविक रवि देवकर यांनी केले. सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष युवराज भोसले यांनी केले तर राम गायकवाड यांनी आभार मानले.

## वात्रटिका

### बहिण लाडकी, लेक...?

बहिण लाडकी आहे
पण लेकीचे काय...
अंगणही वैरी वाटते
थबकले नाजूक पाय...
आपल्याच नादात गुंग
सरकार त्या तिकडे...
गुन्हेगार बळावला,म्हणत
कोण काय करते वाकडे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# राज्यातील कुशल मनुष्यबळाला जर्मनीत नोकरीची संधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जर्मनीतील बाडेन - वुटेनबर्ग या राज्यास महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी २५ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र शासनामार्फत सामंजस्य करार करण्यात आला असून यामुळे जर्मनीत नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. यानुसार राज्यातील १०,००० कुशल मनुष्यबळ टप्याटप्याने पुरविले जाणार आहे. आरोग्य विभागातील परिचारिका, वैद्यकीय सहायक, रेडीओलॉजी सहायक, केअर टेकर, कौशल्य विकास विभागातील सेवक, वेटर, स्वागत, कक्ष संचालक, स्वयंपाकी, हॉटेल व्यवस्थापक तंत्रशिक्षण विभागातील इलेक्ट्रीशिअन, औष्णिक वीज तंत्री, गवंडी कामगार, प्लंबर, वाहनचालक, सुरक्षारक्षक, पॅकर्स व मुवर्स अश्या वेगवेगळ्या ३० क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरवायचे आहे.

याकरिता गोथे संस्थेच्या मार्फत ऑनलाइन व ऑफलाईन स्वरुपात जर्मन भाषा प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण सेवासदन प्रशाला, ज. रा. चंडक प्रशाला, नूतन प्रशाला विजापूर रोड आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) डफरीन चोक सोलापूर या




ठिकाणी प्रशिक्षणार्थींच्या सोयीनुसार सकाळ व संध्याकाळ सत्रात एकूण ५ प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जाणार आहे. तसेच आणखीन ५ वर्ग तालुकास्तरावर वाढविण्याचे नियोजन आहे. प्रत्येक वर्गात २५ प्रशिक्षणार्थी असतील. सदर जर्मन भाषा प्रशिक्षणासाठी शशिकांत शिंदे, अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेळापूर जि. सोलापूर हे समन्वयाचे काम करणार आहेत.

सदर जर्मन भाषा वर्गाचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षानार्थीना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार A1, A2, B1, B2 या स्तराच्या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणास प्रति व्यक्ती ३३ हजार रुपये खर्च शासन करणार आहे. त्यानंतर गरज लागली तर संबधित क्षेत्रातील तांत्रिक कौशल्य प्रशिक्षण सुद्धा देण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून डायटचे प्राचार्य हे मुख्य समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. या संदर्भात दि. ११ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

जर्मन भाषा शिकून जर्मनीत नोकरी करण्यास इच्छुक असलेल्या कौशल्यप्राप्त व्यक्तींनी पुढील लिंकवर नावनोंदणी करावी. https://www.maa.ac.in/GermanyEmployment/ तसेच जर्मन भाषा शिकविणाऱ्या तज्ञ व्यक्तींचे प्रमाण वाढण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शिक्षकांना जर्मन भाषा प्रशिक्षण देण्यात येणार आहे. म्हणून जिल्ह्यातील ज्या शिक्षकांना जर्मन भाषा शिकायची आहे त्यानी https://forms.gle/1Q32ByNwp9MnHmHc7 या लिंकवर नाव नोंदणी करावी असे आवाहन डायटचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे यांनी केले आहे.

# सावतांना राज्यपालनियुक्त कोट्यातून संधी मिळावी

# शिवसेनेचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्याना भेटणार

**माढा (कटूसत्य वृत्त):-** अजित पवार गटाचे माढ्याचे आमदार बबनराव शिंदे अथवा त्यांचे पुत्र रणजितसिंह यांनी महायुतीतुन निवडणुकीला उभा न राहिल्यास माढ्याची जागा शिवसेना शिंदे गटालाच मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करीत मी निवडणुकीला धनुष्य बाण घेऊन सामोरे जाणार असल्याची घोषणा शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांनी माढ्यात केली.

माढा विधानसभा मतदार संघाचा शिवसेना शिंदे गटाचा संवाद मेळावा शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षाची भूमिका जाहीर करण्यासाठी तसेच महायुती सरकारने घेतलेले निर्णय जनतेपर्यंत पोहोचवणे व माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना पक्षाची ताकद वाढवण्यासाठी संवाद मेळाव्याचे माढ्यातील भांगे मंगल कार्यालयात आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. सावंत बोलत होते. बोलताना ते पुढे म्हणाले, लोकांना ग्राह्य धरून चालण्याचे दिवस आता संपले असुन नेते अधिक झालेत.मात्र कार्यकर्त्याची उणीव भासत आहे.

राज्यात महायुतीत काय बिघाड झालाच शिवाय आमदार शिंदे च्या कुटूबांतील व्यक्ती



महायुतीतुन उभा न राहिल्यास माढ्याची जागा शिंदे गटालाच मिळेल आणी मी निवडणुकीला सज्ज असेल असे सांगत माढ्याच्या राजकीय मैदानात उतरण्याचे स्पष्ट संकेत दिले. लोकसभा निवडणुक निकालात राज्यात गणित बिघडलं आता मात्र येत्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचे सरकार पुन्हा आणुन एकनाथ शिंदे यांनाच पुन्हा एकदा मुख्यमंत्री करायचे आहे. त्यासाठी जनतेच्या लोककल्याणकारी सरकारच्या योजना जनते पर्यत पोहचवाव्यात.माढ्याच्या राजकारणात २५ वर्षे आम्ही संघर्ष करीत आलो असुन बदलत्या राजकीय समिकरणात मत जाणुन घेऊन लोकांच्या मनातील राज्यपाल नियुक्त आमदारकीचा विचार मुख्यमंत्र्या पर्यत पोहचवू ते जे ठरवतील त्यांच्या शब्दाबाहेर मी जाणार नाही.

यावेळी कालिदास सावंत, जिल्हा दूध संघाचे माजी संचालक राजाभाऊ चवरे, जेष्ठ नेते विलासराव देशमुख, भैरवनाथ शुगरचे व्हा चेअरमन अनिल सावंत, जनशक्ती शेतकरी संघटनेचे अतुल खूपसे-पाटील, माजी पं. स. सदस्य पृथ्वीराज सावंत, तालुकाप्रमुख मुन्ना साठे, वाकावचे सरपंच ऋतुराज सावंत, नगरसेवक अरविंद खरात, उंदरगावचे सरपंच राजाभाऊ लवटे, निमगावचे सरपंच धर्मराज मुकणे, महातपूरचे उपसरपंच सम्मेद सावळे, वडशिंगेचे माजी सरपंच मधुकर ठोंबरे, संदीप पाटील, चांदजचे माजी सरपंच रामभाऊ टकले, शिवसेनेचे तालुकाप्रमुख उपप्रमुख सचिन कदम, भैय्या खरात, नितीन जाधव, अजिक्य काटे, प्रविण चवरे, स्वप्नील खरात, तानाजी बारबोले, महेश मोहळे, उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुन्ना साठे यांनी केले. यावेळी अरविंद खरात, अजिंक्य काटे,आरती बसवंती, अतुल खूपसे-पाटील, राजाभाऊ चवरे यांनी विचार व्यक्त करताना सावंत परिवाराचे सोलापूर सह धाराशिव जिल्हात असलेल्या राजकीय योगदानाचे महत्व विषद केले.

**सावंताना राज्यपाल नियुक्त कोट्यातुन आमदारकीची संधी द्यावी; मुख्यमंत्र्याना शिष्टमंडळ भेटणार**

राज्यपाल नियुक्त बारा जणांच्या यादीत प्रा. शिवाजीराव सावंत यांचा समावेश करावा. तसेच सावंतांच्या पंचवीस वर्षाच्या सेवेचे सार्थक व्हावे. सावंतांचा विचार केला तरच महायुतीचा धर्म आम्ही पाळू. या मागणी संदर्भात मुख्यमंत्र्याना शिवसेनेचे शिष्टमंडळ भेटणार असल्याची भुमिका जिल्हा दुध संघाचे संचालक राजाभाऊ चवरे यांचेसह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मांडली.

**राजकीय स्वरुप देऊ नका**

सावंत परिवारातील सदस्य अनिल सावंत हे पंढरपूर मंगळवेढ्यात तर पृथ्वीराज व ऋतुराज सावंत हे माढा मतदारसंघात फिरत आहेत ते जनतेच्या समस्या व अडचणी जाणून घेण्यासाठी सावंत परिवारावर लोक किती प्रेम करतात हे सुभाष सावंत यांच्या निधनानंतर आम्हाला समजले त्या लोकांच्या प्रेमाची उतराई व्हावी म्हणून माणूसकी व प्रेम जपण्यासाठी आम्ही फिरतो त्याला राजकीय स्वरुप देऊ नका असे प्रा.शिवाजीराव सावंत म्हणाले.

# पुण्यात MPSC विरोधात कृषी पदवीधरांचे आंदोलन

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** कृषी विभागातील २०२१ तसेच २०२२ मधील निवड झालेल्या मुलांची शिफारस होऊनही त्यांना अद्याप नियुक्ती देण्यात आलेली नाही. तसेच २०२३ आणि २४ मधील आयोगाच्या जाहिरातीमध्ये कृषी पदवीधरांसाठी एकही जागा नव्हती.त्यामुळे संतप्त विद्यार्थ्यांनी मंगळवारी रात्री लाल बहादूर शास्त्री रस्त्यावरील अहिल्या लायब्ररी समोर एकत्रित येत आंदोलन केले. रस्त्यावर मोठ्या संख्येने विद्यार्थी जमा झाल्याने पोलिसांची एकच धावपळ उडाली. रात्री उशिरापर्यंत विद्यार्थी रस्त्यावर जमा झाले होते. आज सकाळी सुद्धा



हजारो विद्यार्थी पुन्हा लाल बहादूर शास्त्री रस्त्यावर जमा झाले आहेत.

निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली जात नाही. तसेच नवीन पदांची जाहिराती प्रसिद्ध केली जात नाही. त्यामुळे अभ्यास करणाऱ्या कृषी पदवीधरांची कोंडी झाली आहे. वय वाढत चालले असून आमच्या भविष्याचे काय? असा प्रश्न कृषी पदवीधर विद्यार्थ्यांना पडला आहे. त्यामुळे कृषी विभागाने नुकतेच २५८ पदे एमपीएससीकडे भरती साठी वर्ग केली आहेत. हे पदे २०२४ च्या जाहिरातीत समाविष्ठ करावीत आणि परीक्षा घ्यावी. त्यामुळे कृषिप्रधान देशात कृषी पुत्रांना न्याय मिळेल अशा भावना आंदोलक विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

# कोलकाता, बदलापूर अमानवी घटनेने निषेधार्थ तीव्र निदर्शने

## लाडकी बहिण म्हणताय सुरक्षेचं काय ?- नसीमा शेख




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आई बहीण पत्नी मुलगी चिमुकली कोण आहे सुरक्षित आहे? बदलापूर येथील अमानवी घटनेने अत्याचाराचा कळस गाठला आहे.आम्ही कोणावर विश्वास ठेवू? सरकार एकीकडे राज्य शासन महिलांना सबलीकरण करण्यासाठी लाडकी बहिण योजना लागू केली पण सुरक्षेचं काय असा सवाल संघटनेचे राज्य अध्यक्ष माजी नगरसेविका नसीमा शेख यांनी केला.

बुधवार दिनांक 21 ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद पूनम गेट येथे अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने कोलकाता आणि बदलापूर येथील अमानवी घटनेच्या निषेधार्थ तीव्र निदर्शने ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

नराधमांना पाठीशी घालणाऱ्या ममता बॅनर्जी मुदार्बाद, कोलकाता बदलापूर अमानवी घटनेचा निषेध असो, लाडकी बहिण योजना नको, सुरक्षित बहीण योजना लागू करा, पीडितांना न्याय देण्यास विलंब का?

तिचा खून पाडला पण ते जिवंत आहेत,ये राक्षसांनो आणखी किती बळी घेता ?, लैंगिक अत्याचाराची विकृती कधी थांबणार ? गृहमंत्री जवाब दो.... आई ,बहीण, पत्नी ,मुलगी ,आजी चिमुकली कोण आहेत सुरक्षित ? अशा आक्रोश घोषणांनी परिसर दणाणून गेले.

यावेळी बोलताना माजी आमदार नरसय्या आडम मास्तर म्हणाले की, या देशात दररोज महिलांवर बलात्कार,अत्याचार होतात याबाबत केंद्र सरकार ची यंत्रणा काय करते? कुचकामी पोलीस प्रशासन काय कामाचे? सरकारच्या दिरंगाई मुळे देशाचे अतोनात नुकसान होत आहे. पीडितांना न्याय मिळत नाही विलंब कशासाठी ? या नराधमांना फाशी का देत नाही ?असे अनेक जनतेच्या मनातील प्रश्न उपस्थित करून सरकारला धारेवर धरले.

यानंतर सिटू चे राज्य महासचिव ॲड.एम.एच.शेख यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केले.

यावेळी व्यापीठावर माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, एम.एच.शेख, युसुफ मेजर, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, फातिमा बेग, ॲड. अनिल वासम, दत्ता चव्हाण, अशोक बल्ला आदींची उपस्थिती होती.

यावेळी शकुंतला पाणीभाते, सुनंदा सुर्यवंशी, गंगुबाई कणकी, अफसाना बेग विल्यम ससाणे विक्रम कलबुर्गी,दाऊद शेख, दीपक निकंबे ,बापू साबळे, अकील शेख, किशोर मेहता, बाबू कोकने, नरेश दुगाने, वसीम मुल्ला, कादर शेख, विजय हरसुरे, बाळकृष्ण मल्याळ, वीरेंद्र पद्मा मल्लेशम कारमपुरी, दत्ता हजारे,विश्वनाथ बिराजदार, बजरंग गायकवाड शाम आडम, सनी शेट्टी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन ॲड.अनिल वासम यांनी केले तर आभार अफसाना बेग यांनी केले.

# दिवाळीत अन्नपूर्णा नमकीन तर्फे दुबई टूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोन्या चांदीचे नाणे मिळवण्याची सुवर्णसंधी रक्षाबंधन ते दिवाळी भाऊबीज पर्यंत खरेदीवर बक्षीस योजना गेल्या 43 वर्षापासून सोलापूर व पुण्यात मिठाई उत्पादन क्षेत्रात नावलौकिक असलेल्या दिवाळीत अन्नपूर्णा नमकीन च्या वतीने रक्षाबंधन ते दिवाळी भाऊबीज पर्यंत खरेदीवर बक्षीसांची आकर्षक योजना राबविण्यात येत आहे यामध्ये लकी ड्रॉ द्वारे दुबई टूर, सोन्या- चांदीचे नाणे मिळवण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. अशी माहिती उत्पादक नंदकिशोर तिवाडी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रसिद्ध मिठाई उत्पादक व विक्रेते नंदकिशोर तिवाडी हे गेल्या 43 वर्षापासून सोलापुरात तर पुण्यात गेल्या ८ वर्षापासून हा व्यवसाय करीत आहेत त्यांनी पुण्यातील अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह कारखान्याची उभारणी केली आहे दरम्यान दिवाळी अन्नपूर्णा नमकीन च्या वतीने रक्षाबंधन ते दिवाळी भाऊबीज पर्यंत मिठाई खरेदी वर भव्य बक्षीस योजना जाहीर केली आहे तिवाडी यांच्या अन्नपूर्णा



नमकीन मिठाई नावाने असलेल्या मिठाई नमकीन बेकरी उत्पादनावर ही बक्षीस योजना आहे.

50 हजार रुपयांची खरेदी केल्यास एक कुपन मिळेल यावर दुबई टूरची दोन बक्षिसे ठेवण्यात आली आहे मुंबई टू दुबई दुबई टू मुंबई असा प्रवास यामध्ये राहणार आहे एका व्यक्तीसाठी तीन दिवस व दोन रात्र यामध्ये विमान प्रवास हॉटेलमधील निवास व तीन दिवस नाष्टा व एक दिवस जेवण अशी सुविधा उपलब्ध राहणार आहे 20000 रुपयांच्या खरेदीवर एक कुपन मिळेल पाच ग्राम वजनाचे सोन्याचे नाणे अशी दोन बक्षीस आहेत तर पाच हजार रुपयांच्या खरेदीवर एक उपाय देण्यात येईल यासाठी 100 बक्षिसे ठेवण्यात आले आहेत यासाठी दहा ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहे.

या योजनेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर दिलेल्या कुपन मधून साधारणता एक डिसेंबर 2024 रोजी लकी ड्रॉ पद्धतीने सोडत काढण्यात येणार आहे वेगवेगळ्या बक्षिसांची वेगवेगळ्या लकी ड्रॉ सोडती असतील योजनेच्या अटी व शर्ती सर्वस्वी दिवाळी अन्नपूर्णा यांच्या असून त्यांनी घेतलेला निर्णय बंधनकारक राहणार आहे यावर कुठेही तक्रार चा करता येणार नाही तेव्हा सर्व ग्राहकांनी या बक्षीस योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नंदकिशोर तिवाडी यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस शैलेश बजाज सचिन खानापुरे व संतोष उदगिरी आदी उपस्थित होते.

# डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिना निमित्त पुस्तकांचा लोकार्पण सोहळा व निर्भय मॉर्निंग

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** दि 20 ऑगस्ट मंगळवार 2024 रोजी डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या 11 व्या स्मृतिदिन निमित्त चार हुतात्मा स्मारक, सोलापूर येथे डॉ दाभोळकर यांच्या 15 पुस्तकांचा लोकार्पण सोहळा व नंतर निर्भय मॉर्निंग काढण्यात आला.

प्रसिद्ध इतिहास अभ्यासक व लेखक सरफराज अहमद यांच्या हस्ते डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या एकूण पंधरा पुस्तकांचा लोकार्पण सोहळा चार पुतळा येथे सकाळी साडेसहा वाजता करण्यात आला. त्यानंतर सात वाजता चार हुतात्मा स्मारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा, डफरीन चौक, महापौर बंगला, महात्मा गांधी पुतळा रेल्वे स्टेशन जवळ या मार्गे निर्भय मॉर्निंग वॉक करण्यात आला. सदर कार्यक्रमास सर्व सामान्य नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शरदचंद्र पवार प्रशाला सोलापूर



येथे दुपारी चार वाजता राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन साजरा करण्यात आला, त्यात डॉ अस्मिता बालगावकर यांनी विद्यार्थ्यांना डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृती दिन निमित्त वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी काही प्रात्यक्षिकांसह प्रयोग करून चमत्कार सादरीकरण करण्यात आले. ग्रंथमित्र कुंदलिक मोरे यांनी बुवा बाजी व त्यामागील विज्ञान मुलांना समजावून सांगितले.

अशा पद्धतीने विविध उपक्रम राबवून डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृती दिनी अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेच्या कार्याध्यक्ष डॉ अस्मिता बालगावकर, अध्यक्ष प्रा शंकर खलसोडे, सचिव लालनाथ चव्हाण यांच्यासह ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, लता ढेरे, निशा भोसले, उषा शहा, अंजली नानल, शकुंतला सूर्यवंशी, संजीवनी देशपांडे, डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, सुरेश व्यवहारे, छाया मोरे, ब्रम्हानंद धडके, व्हि डी गायकवाड, आर डी गायकवाड, केदारीनाथ सुरवसे, प्रसाद अतनुरकर, प्रकाश कनकी, निनाद शहा, ॲड बेसकर, दत्ता चव्हाण, पूजा चव्हाण, विनीत जाधव इ कार्यकर्ते उपस्थित होते.

# आपले सरकार पोर्टल 2.0 द्वारे नागरिकांच्या तक्रारींचा वेळेत निपटारा करावा - ई गव्हर्नन्सचे तंत्रज्ञ दवे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** नागरिक आणि प्रशासन यांना ऑनलाईन संवाद साधण्यासाठी सेतू निर्माण करणारा "आपले सरकार 2.0" हा शासनाचा महत्वपुर्ण प्रकल्प आहे. राज्यातील नागरिकांसाठी ऑनलाईन पध्दतीने तक्रार दाखल करता यावी यासाठी आपले सरकार 2.0 पोर्टल निर्माण करण्यात आले आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी या पोर्टलवर आलेल्या तक्रारींचा निपटारा वेळेत करून दिला पाहिजे, असे आवाहन ई- गव्हर्नसचे तंत्रज्ञ देवांग दवे यांनी केले.

नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित आपले सरकार 2.0 पोर्टल तक्रार निवारण प्रणालीची कार्यपद्धतीबाबत विशेष प्रशिक्षणात दवे मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार,



अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीनकर, महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पोलिस उपायुक्त विठ्ठल कुबाडे, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, तंत्रज्ञ समीर काळे यांचेसह सर्व संबंधित यंत्रणांना प्रमुख तसेच ऑनलाईन द्वारे उपविभागीय अधिकारी, तहसीलदारही उपस्थित होते.

दवे पुढे म्हणाले की, आपले सरकार 2.0 पोर्टल माहे जुलै 2024 मध्ये लॉंच झालेले आहे. राज्यातील नागरिकांसाठी ऑनलाईन पध्दतीने तक्रार दाखल करता यावी. तसेच प्रशासनाने ऑनलाईन पध्दतीने अशा तक्रारींचे निवारण करावे यासाठी "आपले सरकार 2.0" ही तक्रार निवारण प्रणाली मंत्रालयीन विभागांबरोबरच राज्यातील सर्व 36 जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

सद्य स्थितीत सोलापूर जिल्ह्यात 7 हजार 265 तक्रारी असून त्यातील 3 हजार 52 तक्रारीचा निपटारा करण्यात आलेला असून 4 हजार 213 तक्रारी प्रलंबित आहेत. या सर्व तक्रारी पुढील दोन आठवड्यात सोडवावे असेही त्यांनी सूचित केले.

आपले सरकार ही एक क्रांतिकारक ऑनलाईन तक्रार पोर्टल आहे जी सार्वजनिक तक्रारींचे निराकरण करण्याची प्रक्रिया सुलभ करते. पारदर्शक, वापरकर्ता-अनुकूल व्यासपीठ उपलब्ध करून देते. आपल्या नागरिकांना त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी आणि वेळेवर निराकरण शोधण्यासाठी सक्षम करते. या उपक्रमाचे महत्व अनमोल आहे, कारण हे शासनाच्या उत्तरदायित्वाच्या बांधिलकीचे प्रतीक आहे, असे या पोर्टलचे महत्व श्री. दवे यांनी सांगितले.

नागरिकांसाठी आपले सरकार थेट आणि कार्यक्षम चॅनेल प्रदान करते ज्याद्वारे ते त्यांच्या तक्रारींचे निराकरण करू शकतात. ही प्रणाली सरकारच्या कार्यालयात अनेक वेळा भेट देण्याची गरज दूर करते, वेळ आणि मेहनत वाचते, प्रत्येक तक्रारीचे ट्रॅकिंग आणि निराकरण सुनिश्चित केले जाते, त्यामुळे शासनावर विश्वास निर्माण होतो. अखेरीस, आपले सरकार पोर्टल हे लोकांच्या सेवेसाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारण करण्यासाठी शासनाची कटिबध्दता दर्शवत आहे, असे श्री. दवे यांनी सांगून अधिकाऱ्यांसाठी आपले सरकार कार्यक्षमतेने राबविणे अत्यंत महत्वाचे आहे. हे फक्त सार्वजनिक तक्रारींचे व्यवस्थापन कार्यक्षमतेने वाढवत नाही, तर जबाबदारी आणि उत्तरदायित्वालादेखील प्रोत्साहन देते. ही प्रणाली डेटा विश्लेषणाद्वारे मौल्यवान माहिती प्रदान करते, जी पुनरावृत्ती होणाऱ्या समस्यांची ओळख करून देऊन प्रणालीतील समस्यांचे निराकरण करण्यातस मदत करते. अशा डिजिटल उपायांचा अवलंब करून, नवोपक्रम आणि सार्वजनिक सेवेत उत्कृष्टतेसाठी बांधिलकी दर्शवित असल्याचेही त्यांनी सांगितले.

पोर्टलवर आलेल्या तक्रारींचा निपटारा सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत करावा कोणतेही तक्रार जास्तीत जास्त 21 दिवसात निकाली काढावी. जो विभाग जे अधिकारी पोर्टल वरील तक्रारींचा निपटारा वेळेत करत असतील अशा अधिकाऱ्यांना नागरिकांकडून चांगल्या प्रकारचे रेटिंग मिळू शकते. या नवीन पोर्टलमध्ये शासकीय कार्यालय, विभाग व अधिकारी यांच्यासाठी नागरिकांकडून रेटिंगची पद्धत सुरू करण्यात आलेली आहे. या प्रकारे .दवे यांनी आपले सरकार 2.0 पोर्टल बाबत सविस्तर प्रशिक्षण उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

# विश्वशांती गुरुकुल वाखरी येथे पर्यावरणपुरक गणपती तयार करण्याची कार्यशाळा संपन्न

**वाखरी (कटूसत्य वृत्त):-** एम आय टी गुरुकुल वाखरी, पंढरपूर व रोटरी क्लब सोलापूर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा संपन्न झाली. रोटरी क्लबच्या सौ क्षितिजा गाताडे यांनी विविध प्रात्यक्षिक सादर करून प्लॅस्टर ऑफ पॅरिस विरहित पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याचे तंत्रज्ञान सहज व सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना करून दाखविले. यावेळी बोलताना एम आय टी ज्यू कॉलेज चे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी सण, उत्सव साजरे करताना पर्यावरणचा समतोल राखणे हि काळाची गरज आहे याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी कॉलेजच्या हेडमिस्ट्रेस सौ शिबानी बॅनर्जी मॅडम, स्कूल चे प्राचार्य श्री शिवाजी गवळी सर, सौ गवळी मॅडम,रोटरी क्लब सोलापूर नॉर्थ च्या अध्यक्षा डॉ. जान्हवी माखिजा, सचिव स्वप्नील कोंडगुळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एमआयटी गुरुकुल वाखरीच्या सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# झटपट दर्शनासाठी ऑनलाइन चार हजार रुपयांची फसवणूक

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या झटपट दर्शनासाठी ऑनलाइन चार हजार रुपये स्वीकारल्याचे प्रकरण पंढरपुरात चांगलेच तापल्याचे दिसून येत आहे. सामाजिक संघटनेकडून यामध्ये दोन प्रवाह असल्याचे दिसून आले.चेतन रविकांत काबाडे (रा. ठाणे) हे भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनास आल्यानंतर सुमित संभाजी शिंदे यांनी त्यांच्याकडून चार हजार रुपये ऑनलाइन पेमेंट करून घेतले.त्यानंतर संत ज्ञानेश्वर दर्शन मंडपातून दर्शनास सोडले. संबंधित भाविकास पेमेंट केल्याची पावती न मिळाल्याने त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर, त्यांनी रितसर तक्रार नोंदवून पंढरपूर शहर पोलिस ठाणे येथे सुमित संभाजी शिंदे यांच्यावर गुन्हा नोंद केला आहे.याशिवाय, दर्शन मंडप गेटवरील रक्षक सिक्युरिटी कंपनीचे कर्मचारी अभिजित रघुनाथ मंडळे व शुभम श्यामराव मेटकरी या दोन्ही कंत्राटी कर्मचाऱ्याने विनापरवाना दर्शनास सोडल्याने त्यांच्यावर सेवा समाप्तीची कारवाई करण्यात आली आहे.याप्रकरणी भाजप किसान मोचार्चे नेते माउली हळणवर हे मंदिर समितीचे बैठक संपल्यानंतर समितीचे सहा.अध्यक्ष ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्याकडे आले. ज्याने पैसे स्वीकारले त्याच्यावर कारवाई करावी. मात्र जे दोषी नाही अशा कर्मचाऱ्यांची का सेवा समाप्ती केली,असा सवाल विचारला. यानंतर गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी या दोन कर्मचाऱ्यांनी पुन्हा कामावर घेण्याचे आश्वासन दिले, तर दुसऱ्या बाजूने माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, दीपक वाडदेकर यांच्यासह मराठा समाजाचे अन्य मंडळीही आले. त्यांनी ज्या व्यक्तीने पैसे दिले तोही गुन्हेगार आहे. पैसे घेणे आणि देणे हे दोन्ही गुन्हे आहेत. त्यामुळे पैसे देणाऱ्यावरही कारवाई करा,अशी मागणी केली.